# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.१७/०९/२०२४

**<u>प्रभाग समिती ‘जी’ वालीव अंतर्गत अनधिकृत बांधकामावर कारवाई</u>**

दिनांक १७ सप्टेंबर, २०२४ रोजी मा.आयुक्त व मा.अतिरिक्त आयुक्त (दक्षिण) श्री.संजय हेरवाडे यांचे आदेशानुसार, तसेच मा.उप-आयुक्त श्री.अजित मुठे (अतिक्रमण विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग समिती ‘जी’ वालीव अंतर्गत अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

प्रभाग समिती ‘**जी**’ वालीव अंतर्गत गाव मौजे ससूनवघर (शिल्लोतर) सर्वे नं. ३२,३३,३४ येथे अंदाजे २२००० चौ.फुट वीट बांधकाम व पत्राशेडचे १२ अनधिकृत गाळे निष्कासीत करण्यात आले. सदर कारवाई वेळी प्रभाग समिती ‘जी’ च्या सहा.आयुक्त श्रीम. निता कोरे, कनिष्ठ अभियंता (ठेका) कौस्तुभ तामोरे, अरुण सिंग, साहील सावे, वरिष्ठ लिपिक श्री.विजय नडगे, सुरक्षारक्षक व इतर कर्मचारी उपस्थित होते.

सदर मोहिमेत एकूण २२००० चौ.फुटाचे अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्यात आले.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**